MHSN060000491989

**नियमित दिवाणी दावा : ७९/१९८९**

शामराव पोवार (मयत) तर्फे वारस वि.

श्रीमती. हौसाबाई चव्हाण (मयत) तर्फे वारस

## निशाणी १६९ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी दाखल केला असून त्यांचे कथनानुसार प्रस्तुत दावेमधील प्रतिवादी क्र.१/२ पांडुरंग श्रीपती चव्हाण हे दि.१६/०९/२०२० रोजी तसेच प्रतिवादी क्र.१/३ गोरखनाथ श्रीपती चव्हाण हे दि.१५/०५/२०२२ रोजी मयत झाले आहेत. तसेच वादी क्र.२/१ काशीबाई यशवंत पवार या दि.१९/०१/२०२२ रोजी व प्रतिवादी क्र.१/४/१ पद्मीनी ज्ञानदेव चव्हाण या दि.०५/०६/२०१८ रोजी मयत झाल्या असून त्यांचे वारस रेकॉर्डवर आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र.१/४/१ व वादी क्र.२/१ यांचे नाव दावेतून कमी करणेसाठी त्यांच्या नावास कंस करणेत त्यांचे पुढे मयत असे लिहिण्यास परवानगी मिळणेकामी तसेच मयत प्रतिवादी क्र.१/२ व १/३ यांचे अर्जात नमूद वारस रेकॉर्डवर आणणेसाठी त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.१/२, १/३ यांनी नि.१७१ कडे व प्रतिवादी क्र.१/२(क) यांनी नि.१७२ कडे सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज मंजूर करणेस त्यांची काहीही हरकत नसल्याचे कथन केले आहे.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दाव्याची पाहणी केली. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीं विरुध्द पूर्वी दाखल केलेला रे.दि.मु.नं.२१३/१९६५ हा बेकायदेशीर असल्याचे जाहीर होऊन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. वादी हे मयत प्रतिवादी क्र.१/२ व १/३ यांचे वारस रेकॉर्डवर घेऊन तशी दुरुस्ती करु इच्छीतात. तसेच प्रतिवादी क्र.१/४/१ व वादी क्र.२/१ यांचे नाव दावेतून कमी करणेसाठी त्यांच्या नावास कंस करुन त्यांचे पुढे मयत असे नमूद करु इच्छीतात. तसेच प्रस्तुत दावेकामी प्रतिवादी क्र.१/४/१ व वादी क्र.२/१ यांचे

कायदेशीर वारस समाविष्ट असल्याचे दिसून येते. तसेच Plaintiff is the master of suit या तत्वाने दाव्याच्या कामी कोणाविरुध्द दाद मागावयाची व कोणाला दाव्याच्या कामी पक्षकार करायचे? हा सर्वस्वी अधिकार वादीचाच आहे. त्यामुळे वादीचा सदर अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वादींचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांना मयत प्रतिवादी क्र.१/४/१ व वादी क्र.२/१ यांचे नाव दावेतून कमी करणेसाठी त्यांच्या नावास कंस करुन त्यांचे पुढे मयत असे नमूद करणेस परवानगी देण्यात येते.

३. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.१/२ यांचे अर्जात नमूद वारस अनुक्रमे १/२/अ ते १/२/क तसेच मयत प्रतिवादी क्र.१/३ यांचे अर्जात नमूद वारस अनुक्रमे १/३/अ ते १/३/ड यांना पुढील तारखेपर्यंत किंवा तत्पुर्वी अभिलेखावर घ्यावे व तशी दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करावी.

NIRANJAN BALASAHEB CHAVAN
Digitally signed by NIRANJAN BALASAHEB CHAVAN

मिरज

**(निरंजन बा. चव्हाण)**

दिनांक : ०५/०२/२०२५

४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

मिरज.

*****

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | Sou. A.C. Patil, Grade-3 |
| Court. | : | 4th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj |
| Date. | : | 05.02.2025. |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 05.02.2025. |
| Order uploaded on. | : | 06.02.2025. |